9/7/24
4:00

# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दुरध्वनी क्र. ०२५१-२७२०११६, विस्तार क्र.२२५ proumc321@gmail.com


दिनांक : ०९/०७/२०२४

# प्रेसनोट

महापालिका प्रशासक तथा आयुक्त डॉ. अझीझ शेख यांनी आज दिनांक ०९/०७/२०२४ रोजी महापालिका क्षेत्रात वेगवेगळ्या ठिकाणी भेट दिली. त्यामध्ये प्रथम प्रभाग समिती क्र.३ मध्ये पाहणी करतांना माहिती अधिकार, पी.जी.पोर्टल, आपले सरकार यांचे किती अर्ज आले, किती अर्जांचा निपटारा केला, तसेच सदर प्रभाग समिती क्षेत्रातील अतिक्रमण, आरोग्य, अनधिकृत बांधकाम इत्यादी विषयांबाबत काय परिस्थिती आहे, याचा आढावा घेतला. तसेच त्याठिकाणच्या कामाची पाहणी करून संबंधित प्रभाग अधिकारी व कर्मचारी यांना योग्य ते निर्देश दिले.

त्यानंतर व्ही.टी.सी., उल्हासनगर–४ येथील मा. हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे क्रीडासंकुलाची पाहणी केली व तेथील कामगारांची संख्या वाढविणे, कामाला गती देणे, दैनंदिन कामावर देखरेखीसाठी सुपरवायझर उपस्थित ठेवणे, याबाबत निर्देश दिले व साफसफाईच्या कामाची सुध्दा पाहणी केली.

तसेच हवामान खात्याकडून मिळालेल्या माहितीनुसार रेड अॅलर्ट जारी केला असल्याने खबरदारी म्हणून हिरा घाट येथील मुख्य नाल्याची पाहणी करून तेथील परिस्थितीचा आढावा घेतला व सदर ठिकाणची परिस्थिती समाधानकारक असल्याची खात्री केली.

9/7/24

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – माहितीस्तव.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.
१. पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२. सिस्टीम अॅनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.